# कार्यक्रम अहवाल

दिनांक २७.०३.२०२१ रोजी सायंकाळी ७.०० वाजता, ''भारतीय अर्थसंकल्प २०२१–२२ आय–व्यय आणि आर्थिक, सामाजिक कल्याण''  या विषयावर अर्थशास्त्र विभाग (पदवी व पदव्युत्तर) अभ्यासक्रम, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दिक्षाभूमी, नागपूर द्वारे ONLINE WEBINAR चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची अध्यक्षता डॉ. मेहेरे मॅडम, प्राचार्या डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दिक्षाभूमी नागपूर यांनी केले. तर कार्यक्रमाला मार्गदर्शक डॉ. अमित अशोकराव झपाटे, सहा. प्राध्यापक (अंशकालीन), रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर हे लाभले.

केंद्रीय अंदाजपत्रक २०२१–२२ चे विश्लेषण मांडतांना डॉ. अमित झपाटे हयांनी हया वर्षीच अंदाजपत्रक हे digital व paper less अंदाजपत्रक म्हणून ओळखल्या जाईल असे स्पष्ट केले व अंदाजपत्रकाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीपासून अंदाजपत्रकांची मांडणी केली. अंदाजपत्रकातील आय–व्यय हया विश्लेषणाची विस्तृत मांडणी करतांना PPT च्या माध्यमाने अंदाजपत्रक हे कोणत्याही देशासाठी आर्थिक विकासाचा आरसा असल्याचे मत मांडले. देशात रूपया कसा येतो आणि तो खर्च कसा होतो याची अंदाजपत्रकातील मांडणी आकडेवारीसह विश्लेषण मांडले. सोबतच केंद्रिय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारामण यांनी ''आत्मनिर्भर भारत'' याच बरोबर अन्य कोण–कोणत्या योजनांची घोषणा केली व त्यावर किती पैसा खर्च होणार हया स्थितीची माहिती दिली.

डॉ. झपाटे यांच्या आपल्या विश्लेषणातून २०२१–२२ अर्थसंकल्प हे विकासाधिक व सर्व समावेशक नसल्याचे मत नोंदवितांना देशातील अनेक अर्थतज्ज्ञाचा हवालाही दिला. हया अंदाजपत्रकात कशा प्रकारे अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती यांच्याकडे दूर्लक्ष केल्या गेल्याचे मत व्यक्त केले. यातून हया घटकाचा कसा विकास साधता येईल असा प्रश्न उपस्थित केला. यातुन सामाजिक, आर्थिक विषमतेत वाढच

होईल, असेही स्पष्ट केले. याशिवाय शिक्षणात आरोग्य, कृषि आदिवर फार लक्ष न दिल्याचे दिसते. कोरोना लसीकरणासाठी ३५ हजार कोटींची तरतूदही फक्त तात्कालीन आहे ही दिर्घकालीन नाही. याव्यतिरिक्त आरोग्य क्षेत्रात फार काही नविन घडत असल्याचे दिसून येत नसल्याचे म्हटले आहे. मागील वर्षी २४ मार्च २०२० ला LOCKDOWN केल्याला एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला. या काळात उद्योग–धंदे बंद पडल्याने मोठया प्रमाणावर कर्मचारी, कामगार, श्रमीक हे बेरोजगार झाले. त्यांच्या रोजी–रोटीचा प्रश्न कसा सोडविला जाणार याचा हया अंदाजपत्रकात तिळमात्र उल्लेख नाही. उलट ग्रामिण भागात लॉकडावूनच्या काळात बेरोजगारांना रोजगार देणारी 'मनरेगा' यावरील खर्च सुद्धा मागील वर्षीच्या तुलनेत कमी केल्याचे मत नोंदविले. अशाप्रकारे हे अंदाजपत्रक बिघडलेल्या आर्थिक घडीला कशी काय सावरून यातुन पुढे मार्ग काढेल यावर प्रश्न चिन्ह उपस्थित केला. हे अंदाजपत्रक आत्मनिर्भरतेकडे नाही तर देशाला विकण्याकडे वाटचाल करीत असून यातून संवैधानिक अधिकारांची मोठया प्रमाणात गडचेपी होणार असल्याचे म्हटले.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. भूमि मेहेरे मॅडम, हयांनी हे अंदाजपत्रक देशाचे पहिले digital आणि Paperless अंदाजपत्रक म्हणून ओळखल्या जाईल असे मत मांडले. अंदाजपत्रक हा देशाच्या आर्थिक प्रगतिचा आरसा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. सोबतच ज्या अर्थशास्त्राच्या (BA-I, II, III, MA-I , II) विद्यार्थ्यांसाठी हया Webinar चे आयोजन अर्थशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले. त्या विद्यार्थ्यांना हया Webinar चा फायदा अर्थशास्त्र विषयाचे ज्ञान घेतांना होईल असे विचार व्यक्त केले. तद्वतच विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमांचा लाभ नेहमी घ्यावा अशा प्रकारची सुचना व मार्गदर्शन ही केले.

विषयाची प्रास्ताविक डॉ. हरिष बावनगडे, अर्थशास्त्र विभाग, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, नागपूर व सूत्र संचालन प्रा. बडोले अर्थशास्त्र विभाग यांनी केले. आभार

प्रदर्शन प्रा. बालू वनकर यांनी केले. कार्यक्रमाला विशेष उपस्थिती प्रा. विद्या चौरपगार, विभाग प्रमुख राज्यशास्त्र विभाग यांनी नोंदविली. तर बी. ए. भाग १, २ व ३ आणि एम.ए. भाग १ व २ च्या अर्थशास्त्राच्या एकूण ६५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.


कार्यक्रमाच्या सफलतेसाठी अर्थशास्त्र विभागातील डॉ. हरिश बावनगडे व प्रा. बडोले हयांनी परिश्रम घेतले.


दिनांक :२८.३.२०२१


ठिकाण नागपूर


अर्थशास्त्र विभाग


डॉ. आंबेडकर महाविद्यालय,
दिक्षाभूमी, नागपूर



8:45 PM
Bhumi Mehere
You
(18)
MD Bhushan studio 2 mins
Thanks sir
Kabir Kale 1 min
सर असेच नवनवीन initiatives घेत ja.
Puja Wagare 1 min
आम्हाला खूप छान मार्गदर्शन केल्याबद्दल धन्यवाद सर🙏
Karan Bidwaik 1 min
🙏🙏🙏



8:41 PM
(23)
1
HARISH BAWANGADE (You)
Prabhakar Badole
P
Pramit Patil
b
balu wankar


8:13 PM
Vidya Chourpagar
(49)
3
HARISH BAWANGADE (You)
Prabhakar Badole
Vidya Chourpagar


8:11 PM
Bhumi Mehere
(50)
3
HARISH BAWANGADE (You)
Prabhakar Badole
balu wankar


8:07 PM
(49)
3
HARISH BAWANGADE (You)
P
Pramit Patil
Ashish Choudhary


7:27 PM
(59)
S
Surbhi Kumbhre
S
Swapnil Patil
vaibhav kannalwar
V
Vaibhav Motghare


(40)
HARISH BAWANGADE (You)
kajal lokhande
Prabhakar Badole